# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १५/०५/२०२४ (बुधवार) दुपार


### खापरखेडा पोलीसांची कार्यवाही २ घरफोडीचे गुन्हे उघड. १ आरोपी सह ३ लाखाचा मुद्देमाल जप्त

खापरखेडा पोलीस परीसरात पेट्रोलीग करीत असतांना मुखबीर कडुन खबर मिळाली की, चनकापुर येथे राहणारा दिलीप पवरीया याचे घरी कुलुप तोडुन पुनीत भगत याने चोरी केली आहे अशी खात्रीशीर माहीती वरुन दहेगाव येथुन पुनीत भगत यास ताब्यात घेवुन त्याला विचारपूस केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली तसेच त्याने वारेगाव येथे घरफोडी केल्याचे सांगीतले त्याचे कडुन दोन घरफोडी मध्ये चोरी केलेले ०३ लाख रूपयाचे सोन्याचांदीचे दागिने जप्त करून **आरोपी नामे – पुनीत उर्फ पुन्ना राजु भगत वय २२ वर्षे रा. जयभोले नगर चनकापूर** यास अटक करण्यात आली. आरोपी याचेवर घरफोडी, चोरी व जबरी चोरीचे गुन्हे दाखल आहे. पो.स्टे. खापरखेडा येथील डी. बी. पथकाला दोन घरफोडी उघड करण्यास व मुद्देमाल हस्तगत करण्यास यश प्राप्त झाले.

सदर कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग कन्हान संतोष गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार पोलीस स्टेशन खापरखेडा धनाजी जळक याचे नेतृत्वात मपोनी अमरदिप खाडे, फालगुन घोडमारे पोउपनी भारती नरोटे, प्रफुल राठोड, शैलेश यादव, राजु भोयर, मुकेश वाघाडे, कविता गोंडाने, राजकुमार सातुर दिपक रेवतकर, प्रदिप मने यांचे पथकाने पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर